RNI No. MAHBIL/2009/35529

महाराष्ट्र शासन राजपत्र
भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक ११]   गुरुवार ते बुधवार, मार्च १८-२४, २०२१/फाल्गुन २७, शके १९४२-चैत्र ३, शके १९४३   [पृष्ठे १६
किंमत : रुपये १४.००

प्राधिकृत प्रकाशन
शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

THE COMMISSIONER OF POLICE, THANE

NOTIFICATION

No. SB/Communal/01/2021.—In exercise of the powers conferred by section 36 of Maharashtra Police Act, 1951 (Maharashtra XXII of 1951) I, Vivek Phansalkar, Commissioner of Police, Thane hereby authorize all officers incharge of Police Station, All Divisional Asstt. Commissioners of Police and Zonal Dy. Commissioners of Police in their respective areas of Police Commissionerate to exercise the powers under section 36 of the Maharashtra Police Act, 1951 and the same shall remain in force from 00-00 hours of 9th March 2021 to 24-00 hours of 6th June 2021.

VIVEK PHANSALKAR,
Commissioner of Police,
Thane, City.

Thane City,
dated the 4th March 2021.

BY THE COMMISSIONER OF POLICE RAILWAYS, MUMBAI

Order

No. CP/RLY/MUMBAI/PROHIBIT ACTS/2021-05.—Whereas, I consider it necessary for the preservation of public peace and public safety in Mumbai Railway Police Commissionerate. I, Quaiser Khalid, Commissioner of Police, Railways, Mumbai in exercise of the power conferred upon me under sub-section (*1*), (*2*) and (*3*) of section 37 of the Maharashtra Police Act,1951 (Mah. Act XXII of 1951) do hereby prohibit the following acts throughout Mumbai Railway Police Commissionerate for the period from 00-01 hours of 15th March 2021 to 24-00 hrs. of 29th March 2021.

1. (*a*) The carrying of arms, cudgels, swords, spears, bludgeons, unlicensed gun, knives, sticks or lathis or any other articles which is capable of being used for causing physical harms (violence). Save for such firearms where license has been granted by this authority or where specific permission is sought for carriage of such arms from the competent authority.

(*b*) The carrying of any corrosive substance or explosive.

(*c*) The carrying, collection and preparation of stones or other missiles or instruments or means of casting or impelling missiles.

(*d*) The exhibition of persons or corpses or figures of effigies thereof.

(*e*) The public utterance of cries, singing of song, playing of music.

(*f*) Delivery of harangues, the use of gestures or mimetic, representations and the preparations, exhibition or dissemination of pictures, symbols, play cards or any other object or thing which may in the opinion of any police officer posted in Mumbai Railway Commissionerate offend against decency or morality or undermine the security of or tend to over-throw the state.

2. If any persons goes armed with such article or carrying any corrosive substance or explosive or missile in contravention of such prohibition he shall be liable to be disarmed of the corrosive substance or explosive or missile shall be liable to seized from him by any police officer and the article corrosive substance, explosive or missile so seized shall be forfeited to the State Government.

3. This order will not be applicable to any person being in service or employment of any Government or Government undertaking required by his superiors or by the nature of his duties, to carry weapons. The order will also not be applicable to Private Security Guards or Gurkhas or Chowkidars etc., employed on watch-n-ward duties carrying lathis admeasuring in length not exceeding 3 ½ feet.

4. Notwithstanding the expiration of this order after the period herein above mentioned.

(*a*) Any investigation or legal proceeding may be instituted, continued or enforced.

(*b*) Any penalty, forfeiture or punishments incurred in respect of any contravention of this order may be imposed, as if this order had not expired.

5. I further direct that this order shall be published and promulgated in Mumbai Railway Police Commissionerate by affixing copies thereof in conspicuous public places and by announcing the same through Railway announcement system, loudspeakers or megaphone, as well as publishing through media.

Given under my hand & Seal this 10th March 2021.

QUAISER KHALID,
Commissioner of Police,
Railways, Mumbai,

पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांजकडून

मनाई आदेश

क्रमांक पो.उप.आ.मुख्या./मनाई आदेश/१०६४/२०२१.— ज्याअर्थी, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्याकडून जनतेच्या विविध मागण्यांसाठी मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेराव, धरणे, सभा, अतिक्रमण हटवणे तसेच दिनांक ११ मार्च २०२१ रोजी महाशिवरात्री व शब-ए-मेराज (बडी रात) असे सण सर्वत्र साजरे होणार आहेत ;

ज्याअर्थी, मी, विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालयाकडील क्रमाकं/पो.आ.वा./अधि.प्रधान/आदेश/३०/२०२०, दिनांक ९ नोव्हेंबर २०२० अन्वये, मा. पोलीस आयुक्त यांचे महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम ३७ चे पोट-कलम (१) च (३) चे वापरावयाचे अधिकार आम्हांस प्रदान करण्यात आले आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील मिरारोड, काशिमिरा, नवघर, नयानगर, भाईंदर, उत्तन, वसई, माणिकपुर, वालीव, नालासोपारा, तुळींज, विरार व अर्नाळा असे एकुण १३ पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, समाज कंटक व गुंड प्रवृत्तीचे इसम यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करणे सोईचे व्हावे.

त्याअर्थी वरील घटनांच्या अनुषंगाने सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मी विजयकांत सागर पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार, महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ चे पोट-कलम (१) व (३) अन्वये जिवित व वित्त सुरक्षित राहण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था जोपासण्यासाठी खालीलप्रमाणे मनाई आदेश देत आहे :—

शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, बंदुका, लाठ्या किंवा शरीरास इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी कोणतीही वस्तु बाळगणे.

१. दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने जमा करणे.

२. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

३. व्यक्तींच्या किंवा प्रेताकृतीच्या प्रतिमेचे प्रदर्शन करणे.

४. सार्वजनिकरितीने घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजवणे.

५. सभ्यता अगर निती या विरुद्ध असतील अशी किंवा राज्यातील शांतता धोक्यात आणतील किंवा ज्यामुळे राज्य शासन उलथुन पडेल अशी भाषणे, हावभाव, चित्रफलक प्रदर्शित करणे.

६. पाच किंवा पाचपेक्षा अधिक लोकांनी एकत्र जमणे, जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे, घोषणा, प्रतिघोषणा देणे इत्यादी कृत्यांना या आदेशान्वये मनाई करीत आहे.

वरील मनाई आदेश खालील व्यक्तींना लागु राहणार नाही :—

" जो कोणी इसम सरकारी नोकर आहे किंवा ज्यास वरीष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य निमित्ताने शस्त्र घेणे भाग पडेल, किंवा ज्यास अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याने सुट दिलेली आहे."

सदर आदेश खालील मिरवणुका व जमावास लागु राहणार नाहीत :—

१. लग्न कार्यासाठी जमलेले लोक.

२. प्रेतयात्रा व अंत्यसंस्कारासाठी काढण्यात आलेल्या मिरवणुका,

३. सरकारी/निमसरकारी कामासाठी कोर्ट, कचेरी येथे जमलेले लोक .

४. सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था या ठिकाणी जमलेला समुदाय.

५. पोलीस आयुक्त व त्यांनी प्रदान केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेल्या सभा/मिरवणुका.

६. सर्व शासकीय/निमशासकीय कर्मचारी हे कर्तव्य पार पाडत असलेले ठिकाण.

सदर मनाई आदेश दिनांक १० मार्च २०२१ रोजी ०२-०० वाजेपासुन ते दिनांक २४ मार्च २०२१ रोजीचे २४-०० वाजे पर्यंत अंमलात राहील. वरील मनाई आदेशाचा भंग करणाऱ्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम १३५ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

मि.भा., व. वि., पोलीस आयुक्तालय,
दिनांक ९ मार्च २०२१.

विजयकांत सागर,
पोलीस उप आयुक्त (मुख्य),
मि.भा., व. वि., पोलीस आयुक्तालय.

पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांजकडून

मनाई आदेश

क्रमांक विशा/मनाई आदेश/१०७/२०२१.— ज्याअर्थी, ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्याकडून जनतेच्या विविध मागण्यांसाठी मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेराव, धरणे, सभा, उपोषणे इ. कार्यक्रमांचे आयोजन केले जाण्याची शक्यता आहे. तसेच सद्या विविध आंदोलने सुरू आहेत. त्याचप्रमाणे दिनांक ११ मार्च २०२१ रोजी महाशिवरात्री/छत्रपती संभाजी राजे बलिदान दिन व दिनांक १२ मार्च २०२१ रोजी शब-ए-मेराज असे सण उत्सव संपन्न होणार आहे.

सदर घटनांच्या अनुषंगाने माझी खात्री झाली आहे की, ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्याकामी प्रतिबंध आदेश जारी करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१) व (३) अन्वये जीवित व वित्त सुरक्षित राहण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था जोपासण्यासाठी खालील कृत्यांना मनाई आदेश देत आहे :—

(१) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, लाठ्या अथवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बरोबर वाहून नेणे, बाळगणे, जमा करणे व तयार करणे.

(२) दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बरोबर नेणे, जमा करणे व तयार करणे.

(३) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ, द्रव्ये बरोबर नेणे.

(४) सार्वजनिक रितीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे.

(५) कोणत्याही इसमाचे चित्राचे, प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढाऱ्यांच्या चित्राचे प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे.

(६) सभ्यता अगर नीतीमत्ता यास धोका पोहोचेल किंवा राज्यातील शांतता धोक्यात आणतील किंवा ज्यामुळे राज्य शासन उलथून पडेल अशी भाषणे, हावभाव, चित्रफलक प्रदर्शीत करणे.

(७) पाच किंवा पाचापेक्षा लोकांनी लोकांना एकत्र जमणे, जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे, घोषणा, प्रतिघोषणा देणे इ. कृत्यांना या आदेशान्वये मनाई करीत आहे.

वरील मनाई आदेश खालील व्यक्तींना लागु राहणार नाही :—

" जो कोणी इसम सरकारी नोकर आहे किंवा ज्यास वरीष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य निमित्ताने शस्त्र घेणे भाग पडेल, किंवा ज्यास अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याने सुट दिलेली आहे."

सदर आदेश खालील मिरवणुका व जमावास लागु राहणार नाहीत :—

१. लग्न कार्यासाठी जमलेले लोक.

२. प्रेत यात्रा व अंत्यसंस्कारासाठी काढण्यात आलेल्या मिरवणुका.

३. सरकारी/निमसरकारी कामासाठी कोर्ट, कचेऱ्या येथे जमलेले लोक.

४. सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था या ठिकाणी जमलेला समुदाय.

५. पोलीस आयुक्त व त्यांनी प्रदान केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेल्या सभा/मिरवणुका.

६. सर्व शासकीय/निमशासकीय कर्मचारी हे कर्तव्य पार पाडत असलेले ठिकाण.

सदर मनाई आदेश दिनांक १० मार्च २०२१ रोजी ००-०१ वाजेपासुन ते दिनांक १५ मार्च २०२१ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत अंमलात राहील. वरील मनाई आदेशाचा भंग करणाऱ्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम १३५ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

विवेक फणसळकर,
पोलीस आयुक्त,
ठाणे शहर.

ठाणे,
दिनांक २५ फेब्रुवारी २०२१.

उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), कोकण रेल्वे-१, रत्नागिरी यांजकडून

शुद्धिपत्र

क्रमांक उपजि/भुसं/कोरे-१/रत्नागिरी/कावि-३/२०२१.— उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), कोकण रेल्वे-१, रत्नागिरी यांचेकडून एसआर-१, मौजे आरगाव, तालुका लांजा, जिल्हा रत्नागिरी, **महाराष्ट्र शासन राजपत्र** भाग १- कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जानेवारी १४-२०,२०२१/पौष २४-३०, शके १९४२ यामध्ये गट १५६ क्षेत्र ०-०२-०० हा प्रसिद्ध होणेचा राहून गेलेला प्रसिद्धीसाठी सादर करण्यात येत आहे

प्रसिद्ध होणेचा राहिलेला मजकूर

स.नं.	क्षेत्र
१५६	०-०२-००

प्रयोजन : आरगाव ल.पा.योजना, ता. लांजा, जि. रत्नागिरी धरणतळ बुडीत क्षेत्र, सांडवा, प्रवेश व पुच्छ कालव्यासाठी.

रत्नागिरी,

दिनांक २ मार्च २०२१.

ऐश्वर्या के. काळुशे,

उप जिल्हाधिकारी (भूसंपादन),

कोकण रेल्वे-१, रत्नागिरी.

उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), रत्नागिरी यांजकडून

अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक एलएक्यु/एसआर/२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी मौजे-खानू, ता.जि. रत्नागिरी येथील खानु साठवण तलाव, बुडीत क्षेत्र, सांडवा प्रवेश व प्रवेश पुच्छ कालव्यासाठी भूसंपादन होत असून यात यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमिन संपादन करण्याचा, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांचा उद्देश आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनमध्ये देण्यात आलेल्या, सामाजिक प्रभाव आणि सार्वजनिक प्रयोजन यांचे निर्धारण करण्याकरिता प्रारंभिक अन्वेषण करण्यासंबंधीतील तरतुदी विचारात घेता, समुचित शासनाने सामाजिक प्रभाव आणि सार्वजनिक प्रयोजन यांचे निर्धारण करण्याकरिता प्रारंभिक अन्वेषण करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिन संपादन करण्याचा समुचित शासनाचा हेतू असल्यास ते बाधित क्षेत्रामधील ग्राम स्तरावर किंवा वॉर्डस्तरावरील संबंधित पंचायत, नगरपालिका किंवा यथास्थिती, महानगरपालिका यांच्याशी विचारविनिमय करून अशा शासनाकडून अधिसुचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रितीने आणि अशा दिनांकापासून सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अंमलात आणेल अशी तरतूद उक्त अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम १ मध्ये करण्यात आली आहे.

त्याअर्थी आता उपरोक्त कायद्याचे कलम ३ चे पोट कलम (ई) प्रमाणे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना समुचित शासन म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे आणि कलम ३ चे पोट-कलम (ग) नुसार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी त्यांचेवतीने पुढील कार्यवाही करण्यासाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), कोकण रेल्वे-१, रत्नागिरी यांना प्राधिकृत केले आहे. सबब याद्वारे उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), कोकण रेल्वे-१, रत्नागिरी असे अधिसूचित करीत आहे की, बाधित क्षेत्रामध्ये भाकर सेवा संस्था, मु.पो. कोंडये, ता.लांजा जि.रत्नागिरी यांच्याकडून भूमी संपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१३, मध्ये विहित केलेल्या रितीने दिनांक २२ मार्च २०२१ पासून सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्यात येईल.

अनुसूची

प्रयोजन : खानु साठवण तलाव, बुडीत क्षेत्र, सांडवा प्रवेश व प्रवेश पुच्छ कालव्यासाठी

गावाचे नाव - खानू तालुका-रत्नागिरी, जिल्हा-रत्नागिरी

एकूण क्षेत्र (हे.आर) - १२-८१-६५

अ.क्र.	सर्व्हे नंबर/गट नंबर	संपादन करावयाच्या क्षेत्राच्या चतु:सीमा			
		पूर्व	पश्चिम	उत्तर	दक्षिण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	५०५ पै	५१०	५०५ पै	५०४	५०५ पै
२	५०८ पै	५१०	५०८ पै	५०९	४९१
३	५०९ पै	५०९ पै	५०९ पै	५०५	४९१
४	५१० पै	५२५	५०४, ५०५	५११	५१० पै
५	५११	५२४	५०४	५१३	५१०
६	५१२	५२३	५१३	५१८	५११, ५२४

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
७	५१३ पै	५१२	५१५	५१८, ५१६	५११, ५०२
८	५१५ पै	५१३	५१५ पै	५१३	५१३
९	५१८ पै	५१९,५२३	५१६, ५१८ पै	५१९	५१३, ५१२
१०	५१९ पै	५१९ पै	५१८	५१९ पै	५२३, ५२०, ५२१
११	५२०	५१९	५१९	५१९	५२२,५२३
१२	५२१ पै	५३५	५२२	५१९, ५२०	५३४
१३	५२२	५२१	५२३	५२०	५३४
१४	५२३	५२२, ५३१	५१२, ५१८	५१९, ५२०	५२४, ५२६
१५	५२४	५२३, ५२६	५११	५१२, ५२३	५१०, ५११
१६	५२५	५२६	५१०	५२६	५१०, ५२८
१७	५२६	५३०, ५२९	५२४, ५२३	५३१, ५२३	५२५, ५६५
१८	५२७ पै	५६५	५१०	५२६	५२७ पै
१९	५२८	५२६	५२५	५२५	५१०, ५२७
२०	५२९ पै	५२९ पै	५२६, ५६५	५३०, ५३२	५६४, ५२९ पै
२१	५३०	५३३	५२६	५३१	५२६, ५२९
२२	५३१	५३४	५२३, ५२६	५३४, ५२२	५२६, ५३०
२३	५३२ पै	५३२ पै	५३३, ५३०	५३३	५२९
२४	५३३ पै	५३५, ५३३ पै	५३४, ५३१, ५३०	५३३ पै	५३२
२५	५३५ पै	५३५ पै	५३३	५३३	५३२
२६	५३४	५३३	५३१	५२१, ५२२	५३०, ५३३
२७	५६५ पै	५२९	५२६	५२९	५६४, ५६५ पै
२८	५६४ पै	५२९	५६४	५२९	५६४ पै
२९	५१६ पै	५१८	५१६ पै	५१८	५१३
३०	४७६ पै	४९०अ	४७६ पै	४८९	- - - -
३१	४८९ पै	४९०ब	४८९ पै	४९१	४९०अ
३२	४९० ब पै	४९०अ	४८९	४९१	४९०अ
३३	४९१ पै	४९१ पै	५०८	५०८, ५०९	४९१ पै
३४	४९२ पै	४९१	४९२ पै	४९७	४८९, ४९१
३५	४९७ पै	४९१	४९७ पै	५०८	४९२
३६	५०२ पै	५११, ५१३	५०२ पै	५१३	५०३
३७	५०३ पै	५०४	५०२, ५०३ पै	५०२	५०४
३८	५०४ पै	५१०, ५११	५०३, ५०४ पै	५११	५०५
३९	४९०अ पै	४९० अ पै	४७६, ४८९	४८९, ४९०	- - - -

ऐश्वर्या के. काळुशे,
उप जिल्हाधिकारी (भूसंपादन),
कोकण रेल्वे-१, रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक २ मार्च २०२१.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांजकडून

संदर्भ :— १. श्री. अ. सि. आवटे, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, खेड यांचा दिनांक २ फेब्रुवारी २०२१ ते ४ फेब्रुवारी २०२१ असा तीन दिवसांचा परिवर्तीत रजेचा अर्ज.

२. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी आस्था. ७२४/२०२१, दिनांक ४ फेब्रुवारी २०२१.

३. जिल्हा न्यायालय-१, खेड म.जा.क्र. १८२/२०२१, दिनांक ५ जून २०२१.

कार्यालयीन आदेश

क्रमांक बी-२/१३१९/सन २०२१.— रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये पाठविण्यात आलेला परिवर्तीत रजेचा अर्ज संदर्भ क्र. ३ नुसार प्रकृती स्वास्थ्य व अस्वास्थ्याचे प्रमाणपत्र पाठविलेनुसार त्यांची खालील नमूद परिवर्तीत रजा मंजूर करण्यात येत आहे. रकाना क्रमांक (६) मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे सदर रजेच्या मुदतीतील कार्यभार ठेवणेत आला होता :—

अ. क्र.	न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित/ परिवर्तीत रजा	अर्जित/परिवर्तीत रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१.	श्री. अ. सि. आवटे, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, खेड.	३०६ दिवस परिवर्तीत रजा.	दिनांक २ फेब्रुवारी २०२१ ते दिनांक ४ फेब्रुवारी २०२१ पर्यंत तीन दिवस परिवर्तीत रजा.	दिनांक २ फेब्रुवारी २०२१ चे कार्यालयीन वेळेपूर्वीपासून ते दिनांक ५ फेब्रुवारी २०२१ चे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्री. डी. एल. निकम, जिल्हा न्यायाधीश-२ व अति. सत्र न्यायाधीश, खेड.

रजेवरून परत आल्यावर न्यायिक अधिकारी यांना त्यांचे पदावर पुर्ननियुक्त करणेत आले आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदावर पर्यायी अधिकाऱ्याची नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवणेत आले होते. वरील न्यायिक अधिकारी हे वर नमूद केलेल्या कालावधीत परिवर्तीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिकाऱ्यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

रत्नागिरी,
दिनांक १ मार्च २०२१.

एम. क्यु. एस. एम. शेख,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांजकडून

संदर्भ :— १. श्री. डी. एस. झंवर, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, रत्नागिरी यांचा दिनांक १९ फेब्रुवारी २०२१ व २० फेब्रुवारी २०२१ ची दोन दिवसांचे अर्जित रजेचा अर्ज.

२. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी आस्था. बी-२/११८७, सन २०२१, दिनांक २३ फेब्रवारी, २०२१.

कार्यालयीन आदेश

क्रमांक बी-२/१३२०/सन २०२१.— रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज संदर्भ क्र. १ व २ चे पत्रानुसार कार्योत्तर मंजूर करीत आहे. तसेच रकाना क्रमांक (६) मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत आला होता :—

अ. क्र.	न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित/ परिवर्तीत रजा	अर्जित/परिवर्तीत रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१.	श्री. दि. स. झंवर दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, रत्नागिरी.	२७४ दिवस अर्जित रजा.	दिनांक १९ फेब्रुवारी २०२१ व दिनांक २० फेब्रुवारी २०२१ ची दोन दिवस अर्जित रजा.	. . . . . दिनांक १९ फेब्रुवारी २०२१ चे कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक २१ फेब्रुवारी २०२१ चे कार्या. वेळेपूर्वीपर्यंत	श्री. जी. जी. इटकळकर, मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी यांचकडे दिनांक १९ फेब्रुवारी २०२१ चे कार्या. वेळेपासून ते दिनांक २० फेब्रुवारी २०२१ चे कार्या. वेळेपूर्वीपर्यंत तसेच ***

*** श्री. एस. एन. सरडे, सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी यांजकडे दिनांक २० फेब्रवारी २०२१ चे कार्यालायीनवेळेपासून ते दिनांक २१ फेब्रुवारी २०२१ चे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंतचा पदभार ठेवणेत येत आहे.

रजेवरून परत आल्यावर न्यायिक अधिकारी यांना त्यांचे पदावर पुनर्नियुक्त करणेत आलेले आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदावर पर्यायी अधिकाऱ्याची नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवणेत आले होते. वरील न्यायिक अधिकारी हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिकाऱ्यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

एम. क्यु. एस. एम. शेख,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक १ मार्च २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./११३६/२०२१.— श्री. आर. एस. भाकरे, सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल यांची दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ ते दिनांक १८ फेब्रुवारी २०२१ अशी ३ दिवसांची अर्जित रजा, पुढील दिनांक १९ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या सुट्टीला जोडून मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. आर. एस. भाकरे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. आर. एस. भाकरे, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

श्री. आर. एस. भाकरे, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. ए. यु. बहिर, २रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल यांजकडे राहील.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक १६ फेब्रुवारी २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./११३७/२०२१.— श्रीमती एन. एस. सराफ, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल, जिल्हा रायगड, यांची शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१७/प्र.क्र. २५/सेवा-६, मंत्रालय, मुंबई, दिनांक २३ जुलै २०१८ व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील पत्र क्र. Rule/P1604/2018/163, Dated 21/08/2018 अन्वये दिनांक २२ फेब्रुवारी २०२१ ते २४ फेब्रुवारी २०२१ या कालावधीतील ३ दिवसांची बालसंगोपन रजा, मागिल दिनांक २१ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या सुट्टीला जोडून तसेच दिनांक २० फेब्रुवारी २०२१ रोजी का.वे.नं.पासून ते दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या का.वे.पूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती एन. एस. सराफ, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल, जिल्हा रायगड येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती एन. एस. सराफ, ह्या जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल, जिल्हा रायगड, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहील्या असत्या.

श्रीमती एन. एस. सराफ, ह्या रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

दिनांक २० फेब्रुवारी २०२१ रोजी का.वे.नं.पासून ते दिनांक २२ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या का.वे.पूर्वीपर्यंत त्यांच्या न्यायालयाचा कार्यभार श्री. ए. एस. सोनवलकर, ५वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल, जिल्हा रायगड यांजकडे राहील.

दिनांक २२ फेब्रुवारी २०२१ रोजी का.वे.पू. पासून ते दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या का.वे.पूर्वी पर्यंत त्यांच्या न्यायालयाचा कार्यभार श्री. के. के. घुले, २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल, जिल्हा रायगड यांजकडे राहील.

उपरोक्त न्यायिक अधिकारी जर गैरहजर असतील तर त्यांच्या न्यायालयाचा कार्यभार स्थायी आदेशाप्रमाणे राहील.

सदरहू रजेची नोंद संबंधित न्यायीक अधिकारी यांच्या सेवापुस्तकात ठेवण्यात यावी.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक १६ फेब्रुवारी २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./११३८/२०२१.— श्रीमती एम. ए. आनंद, जिल्हा न्यायाधीश-२, पनवेल यांची दिनांक ८ फेब्रुवारी २०२१ ते दिनांक ११ फेब्रुवारी २०२१ अशी ०४ दिवसांची परिवर्तीत रजा, मागील दिनांक ७ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या सुट्टीला जोडून दिनांक १२ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती एम. ए. आनंद, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची जिल्हा न्यायाधीश-२, पनवेल, जिल्हा रायगड येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती एम. ए. आनंद, ह्या जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर जिल्हा न्यायाधीश-२, पनवेल, जिल्हा रायगड, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहील्या असत्या.

श्रीमती एम. ए. आनंद, ह्या रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. एन. बी. लवटे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, पनवेल, जिल्हा रायगड यांजकडे राहील.

उपरोक्त न्यायिक अधिकारी जर गैरहजर असतील तर त्यांच्या न्यायालयाचा कार्यभार स्थायी आदेशाप्रमाणे राहील.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक १५ फेब्रुवारी २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./११९४/२०२१.— श्रीमती पी. एस. जी. चाळकर, ४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, अलिबाग यांची दिनांक ०१ मार्च २०२१ ते दिनांक ०३ मार्च २०२१ अशी ०३ दिवसांची अर्जित रजा मागील दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ व २८ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या सुट्टीला जोडून दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक ०४ मार्च २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती पी. एस. जी. चाळकर, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची ४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, अलिबाग म्हणून पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती पी. एस. जी. चाळकर, ह्या अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर ४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठस्तर, अलिबाग या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहील्या असत्या.

श्रीमती पी. एस. जी. चाळकर, ह्या अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती अे. व्ही. मोहिते, २रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, अलिबाग यांजकडे राहील.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक १७ फेब्रुवारी २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./१२४४/२०२१.— श्रीमती एम. ए. आनंद, जिल्हा न्यायाधीश-२, पनवेल यांची दिनांक ०१ मार्च २०२१ ते दिनांक २० मार्च २०२१ अशी २० दिवसांची अर्जित रजा मागील दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ व २८ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या चौथ्या शनिवार व रविवारच्या सुट्टीला जोडून व पुढील दिनांक २१ मार्च २०२१ रोजीच्या रविवारच्या सुट्टीला जोडून दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक २२ मार्च २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती एम. ए. आनंद, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची जिल्हा न्यायाधीश-२, पनवेल, जिल्हा रायगड येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती एम. ए. आनंद, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर जिल्हा न्यायाधीश-२, पनवेल, जिल्हा रायगड, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहील्या असत्या.

श्रीमती एम. ए. आनंद, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांच्या न्यायालयाचा कार्यभार श्री. एन.बी. लवटे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, पनवेल, जिल्हा रायगड यांजकडे राहील.

उपरोक्त न्यायिक अधिकारी जर गैरहजर असतील तर त्यांच्या न्यायालयाचा कार्यभार स्थायी आदेशाप्रमाणे राहील.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक २२ फेब्रुवारी २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./११५४/२०२१.— श्री. अे.अे. पांडे, ४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठस्तर, पनवेल यांची दिनांक १८ फेब्रुवारी २०२१ ते दिनांक २० फेब्रुवारी २०२१ अशी ०३ दिवसांची अर्जित रजा दिनांक १७ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक २१ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. अे.अे. पांडे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची ४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठस्तर, पनवेल म्हणून पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. अे.अे. पांडे, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर ४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठस्तर, पनवेल या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

श्री. अे.अे. पांडे, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीतील त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. ए. एस. सोनवलकर, ५वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठस्तर, पनवेल यांजकडे राहील.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक १७ फेब्रुवारी २०२१.

प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./१२६६/२०२१.— श्री. अे.अे. पांडे, ४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठस्तर, पनवेल यांची दिनांक २४ फेब्रुवारी २०२१ ते दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ अशी ०३ दिवसांची अर्जित रजा पुढील दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ व २८ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या चौथ्या शनिवार व रविवारच्या सुट्टीला जोडून व दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक १ मार्च २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. अे.अे. पांडे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची ४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठस्तर, पनवेल म्हणून पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. अे. अे. पांडे, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर ४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठस्तर, पनवेल या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

श्री. अे.अे. पांडे, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळ संपेपर्यंत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. ए. एस. सोनवलकर, ५वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल यांजकडे राहील.

दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक १ मार्च २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. के. के. घुले, २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल यांजकडे राहील.

आर. जी. मलशेट्टी,
प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड,
दिनांक २३ फेब्रुवारी २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./१३४५/२०२१.— श्रीमती एन. एस. सराफ, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल, यांची दिनांक २२ फेब्रुवारी २०२१ ते दिनांक २४ फेब्रुवारी २०२१ अशी ०३ दिवसांची बालसंगोपन रजा रद्द करून, दिनांक २२ फेब्रुवारी २०२१ व दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ रोजीची ०२ दिवसांची अर्जित रजा मागील दिनांक २१ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या रविवारच्या सुट्टीला जोडून दिनांक २० फेब्रुवारी २०२१ रोजीच्या का.वे.नं.पासून ते दिनांक २४ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या का.वे.पूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यात येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती एन. एस. सराफ, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल म्हणून पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती एन. एस. सराफ, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहील्या असत्या.

श्रीमती एन. एस. सराफ, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. के. के. घुले, २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल, यांजकडे राहील.

उपरोक्त न्यायिक अधिकारी जर गैरहजर असतील तर त्यांच्या न्यायालयाचा कार्यभार स्थायी आदेशाप्रमाणे राहील.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड,
दिनांक २५ फेब्रुवारी २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./१३४४/२०२१.— श्री. एस. व्ही. स्वामी, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग, यांची दिनांक १ मार्च २०२१ ते दिनांक ६ मार्च २०२१ अशी एकूण ६ दिवसांची अर्जित रजा मागील दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ व दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या चौथ्या शनिवार व रविवारच्या सुट्टीला व पुढील दिनांक ७ मार्च २०२१ रोजीच्या रविवारच्या सुट्टीला जोडून तसेच दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक ८ मार्च २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यात येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. एस. व्ही. स्वामी, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. एस. व्ही. स्वामी, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

श्री. एस. व्ही. स्वामी, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीतील त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. एस. डी. घनवट, सह दिवानी न्यायाधीश, व. स्तर, अलिबाग यांजकडे राहील.

वि. प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक २४ फेब्रुवारी २०२१.

प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./१२६७/२०२१.— श्रीमती एम. ए. के. शेख, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मुरुड, यांची दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ ते दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ अशी एकूण ४ दिवसांची परावर्तित रजा मंजूर करणेत येत आहे.

श्रीमती एम. ए. के. शेख, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मुरुड, येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती एम. ए. के. शेख, ह्या जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मुरुड, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहील्या असत्या.

श्रीमती एम. ए. के. शेख, ह्या रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ ते दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ या कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती एस. व्ही. घारगे, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, अलिबाग यांजकडे राहील.

उपरोक्त न्यायिक अधिकारी जर गैरहजर असतील तर कार्यभार स्थायी आदेशाप्रमाणे राहील.

आर. जी. मलशेट्टी,
प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक २३ फेब्रुवारी २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./१४०९/२०२१.— श्री. एम. व्ही. तोकले, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कर्जत, यांची दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ व दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ अशी एकूण २ दिवसांची परिवर्तित रजा पुढील दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ व २८ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या चौथ्या शनिवार व रविवारच्या सुट्टीस जोडून पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. एम. व्ही. तोकले, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कर्जत, म्हणून पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. एम. व्ही. तोकले, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कर्जत, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

श्री. एम. व्ही. तोकले, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती एस. जे. डोलारे, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कर्जत, यांजकडे राहील.

वि. प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड,
दिनांक १ मार्च २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./१४१०/२०२१.— श्री. व्ही. आर. डोईफोडे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, महाड, यांची दिनांक २२ फेब्रुवारी २०२१ ते दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ अशी ५ दिवसांची परिवर्तित रजा, पुढील दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ व २८ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या चौथ्या शनिवार व रविवारच्या सुट्टीला जोडून पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. व्ही. आर. डोईफोडे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, महाड, म्हणून पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. व्ही. आर. डोईफोडे, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, महाड, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

श्री. व्ही. आर. डोईफोडे, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीतील त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती व्ही. आर. कुलकर्णी, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव यांजकडे राहील.

वि. प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड,
दिनांक १ मार्च २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./१४११/२०२१.— श्रीमती एस. एस. पानसरे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल यांची दिनांक १७ फेब्रुवारी २०२१ व दिनांक १८ फेब्रुवारी २०२१ अशी २ दिवसांची परिवर्तित रजा, पुढील दिनांक १९ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या सुट्टीला जोडून दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या का. वे. नं. पासून ते दिनांक २० फेब्रुवारी २०२१ रोजीच्या का. वे. पुर्वीपर्यत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती एस. एस. पानसरे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल म्हणून पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती एस. एस. पानसरे, ह्या अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिल्या असत्या.

श्रीमती एस. एस. पानसरे, ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, पनवेल, ह्या अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या का.वे.नं.पासून ते दिनांक १७ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या का. वेळ संपेपर्यंत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. ए. ए. पांडे, ४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल यांजकडे राहील.

दिनांक १७ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या का.वे.नं.पासून ते दिनांक १८ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या का. वेळ संपेपर्यंत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. ए. एस. सोनवलकर, ५वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल यांजकडे राहील.

उपरोक्त न्यायिक अधिकारी जर गैरहजर असतील तर त्यांच्या न्यायालयाचा कार्यभार स्थायी आदेशाप्रमाणे राहील.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड,
दिनांक १ मार्च २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./१४२१/२०२१.— श्रीमती एफ. एफ. ईराणी, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण, यांची दिनांक ८ मार्च २०२१ ते दिनांक १२ मार्च २०२१ अशी ५ दिवसांची अर्जित रजा, मागील दिनांक ७ मार्च २०२१ रोजीच्या रविवारच्या सुट्टीला व पुढील दिनांक १३ मार्च २०२१ व १४ मार्च २०२१ रोजीच्या दुसऱ्या शनिवार व रविवारच्या सुट्टीला जोडून, दिनांक ६ मार्च २०२१ रोजीच्या का. वे. नं पासून ते दिनांक १५ मार्च २०२१ रोजीच्या का. वे. पुर्वीपर्यत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यात येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती एफ. एफ. ईराणी, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण, येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती एफ. एफ. ईराणी, ह्या जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहील्या असत्या.

श्रीमती एफ. एफ. ईराणी, ह्या रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. आर. बी. पोळ, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण यांजकडे राहील.

वि. प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड,
दिनांक ३ मार्च २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.